**—: प्रेसनोट :—** दि. १९/०३/२०२१

यातील आलोसे यांनी फिर्यादी यांचे दि मालाड समिर को.ऑ.हौ.सोसा. लि. या संस्थेतील फ्लॅट नं. सी/४११ चे सभासदत्व बाबतचे आदेश काढण्याकरीता कायदेशीर परिश्रमा खेरीज परितोषण म्हणून १,००,०००/— रूपयाची मागणी करून तडजोडीअंती ७५ हजार रुपये रोख रक्कमेचा गैरलाभ स्वत:साठी मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून गुन्हा नोद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १७/२०२१ |
| कलम | ७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपिताचे नाव व कार्यालय | श्री महेश एन साळुंकेपाटील, उप निबंधक, (श्रेणी—१) सहकारी संस्था, 'पी' विभाग, कांदीवली पुर्व, मुंबई रा.ठी. ए/५०२, टेकवुड को ऑ हौ सोसा. लि.,वसंत गार्डन, स्वप्न नगरी जवळ, मुलूंड पश्चिम, मुंबई—८० |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,००,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | — |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यानी त्यांचे मयत आईच्या मालकीचा दि मालाड समिर को ऑ हौ सोसा.लि., मालाड पश्चिम, मुंबई या संस्थेतील फ्लॅट नं.सी/४११ चे सभासदत्व व शेअर सर्टीफिकेट ट्रान्सफर करण्याकरीता उप निबंधक सहकारी संस्था, पी विभाग, कांदीवली पुर्व मुंबई या कार्यालयात अपील अर्ज केला होता. सदर अपील अर्जावर सुनावणी होऊन फिर्यादी याना सभासद करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.<br>यातील आलोसे श्री महेश साळुंकेपाटील, उप निबंधक सहकारी संस्था, पी विभाग, कांदीवली पुर्व मुंबई यांनी फिर्यादी यांचे दि मालाड समिर को.ऑ.हौ.सोसा. लि. या संस्थेतील फ्लॅट नं. सी/४११ चे सभासदत्व बाबतचे आदेश काढण्याकरीता कायदेशीर परिश्रमा खेरीज परितोषण म्हणून रु. १,००,०००/— रुपयाची लाचेची मागणी करुन दिनांक ८/३/२०२१ रोजीचे पडताळणीदरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडुन तडजोडीअंती ७५,०००/— रुपये रोख रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

१९/०३/२१

( हेमंत सावंत )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क — लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०

संकेतस्थळ — acbmaharastra.gov.in

ईमेल — १) acbwebmail@mahapolice.gov.in

२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.

ऑनलाईन तक्रार अर्ज — www.acbmaharastra.net. टोल फ्रि. क्र. १०६४

दुरध्वनी क्र. ०२२ २४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned with CamScanner